# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## परिपत्रक

Estd. 1962
NAAC 'A' Grade

**(सर्व अभ्यासक्रमाच्या एम. फिल./प्रि. पीएच. डी. कोर्सवर्क लेखी परीक्षेस बसणा–या विद्यार्थ्यांच्यासाठी)**

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी 2020 मधील सर्व विषयांच्या एम. फिल./प्रि. पीएच. डी कोर्सवर्क परीक्षेसाठी विहित प्रक्रियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या तथापि ज्या विषयांचे कोर्सवर्क पुर्ण झालेले आहे अशा विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर आयोजनाबाबत अधिकार मंडळानी मान्यता दिलेली असून, त्यांचे मार्गदर्शक तत्वानुसार सर्व विषयांच्या परीक्षांचे नियोजन पुढीलप्रमाणे करणेत येत आहे.

1. एम. फिल./प्रि. पीएच. डी कोर्सवर्क लेखी परीक्षेसाठी विहित प्रक्रियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या तथापि ज्या विषयांचे कोर्सवर्क पुर्ण झालेले आहे अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने संबंधीत अधिविभागामार्फत आयोजित करण्यात येतील
2. सदर सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. 31 डिसेंबर, 2020 पूर्वी घेणेत येत आहेत. (परीक्षांचे वेळापत्रक संबंधीत अधिविभागामार्फत तयार करून जाहीर करण्यात येईल.)
3. ज्या विषयांचे कोर्सवर्क अद्याप पुर्ण झालेले नाही त्या विषयांची सविस्तर माहिती संबंधीत अधिविभागने पीजीबीयुटीआर विभाग यांचेकडे सादर करण्यात यावी. सदर माहिती पुढील विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर करणेत यावी.
4. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेत येईल.
5. कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल/सूचना सोबत जोडलेल्या असून त्यानुसार योग्य ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

**(गजानन पळसे)**
**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**संदर्भ क्रं.: शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/** 390
**दिनांकः– 27 नोव्हेंबर, 2020**

प्रति,

1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– सर्व प्रशासकीय विभाग
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी